ePaper

## राष्ट्रवादीतील 20 ते 25 मा. नगरसेवक शरद पवार गटाच्या वाटेवर?



‖ वर्ष - 7 । अंक - 350 ‖ UDYAM-MH-26-0158827 ‖

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- सुपर ८ फेरीत वाढल्या अडचणी
- टीम इंडियाने पार केली 'अफगाण खिंड'
- लवकरच विधानसभा निवडणुका
- केजरीवाल यांना जामीन मंजूर

www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 21 जून 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## राज्य सरकारकडून उच्च द्रुतगती उन्नत महामार्गाचा आराखडा जाहीर

# 'एचसीएमटीआर'बाबत संभ्रम!

### » उन्नत रस्ता की निओ मेट्रो करणार? अद्याप निर्णयच नाही

। पुणे । महाईन्यूज

**राज्य सरकारने वर्तुळाकृती उच्च द्रुतगती उन्नत महामार्गाची (एचसीएमटीआर) अंतिम अधिसूचना काढून या आरक्षणाचा आराखडा जाहीर केला. या ३५ किलोमीटर लांबीच्या रस्त्यावर सार्वजनिक बससेवेसाठी उन्नत (एलीव्हेटेड) रस्ता तयार करणार, की निओ मेट्रो करणार, याचा निर्णय महापालिका आणि राज्य सरकारला घेता आलेला नाही. प्रशासन आणि राजकीय पातळीवर संभ्रमावस्था असताना दुसरीकडे वाहतूक कोंडीत अडकलेल्या पुणेकरांना मात्र या निर्णयाचा सध्या काहीच फायदा होणार नसल्याचे स्पष्ट आहे.**

पुणे महापालिकेच्या १९८७च्या विकास आराखड्यात शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी म्हणून 'एचसीएमटीआर'चे आरक्षण निश्चित करण्यात आले. हा वर्तुळाकृती रस्ता झाल्यास सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेसाठी मोठे पाठबळ मिळेल, नागरिकांना गतीने आणि सुरक्षित प्रवास करता येईल, असे सांगितले गेले होते. हा प्रकल्प होणार असल्याने खासगी जागा मालकांकडून टीडीआर, एफएसआयच्या माध्यमातून जागा ताब्यात घेण्यात आलेल्या आहेत. तर शासकीय जमिनींचे अद्याप भूसंपादन झालेले नाही. १९८७ ते २०२४ पर्यंत 'एचसीएमटीआर'बाबत काहीच न झाल्याने हे आरक्षण कागदावरच राहिले होते.







'एचसीएमटीआर' प्रकल्प करण्यामध्ये राजकीय इच्छाशक्ती महत्त्वाची आहे. त्यामुळे राज्यातील सत्ताधाऱ्यांनी ठोस भूमिका घेऊन हा रस्ता कसा विकसित केला जावा, त्यासाठी निधी किती लागणार, त्याची कशी उभारणी करणार, हे प्रशासकीय पातळीवर ठरणार आहे. त्यामुळे 'एचसीएमटीआर'ची अंतिम अधिसूचना निघाली असली, तरी हा मार्ग कसा विकसित होणार हे सांगता येणार नाही, अशी सावध भूमिका महापालिकेतील अधिकाऱ्यांनी घेतली आहे.

### मग निओ मेट्रोचा प्रस्ताव

निओ मेट्रो म्हणजे रबरी चाकांवर व विजेवर धावणारी मेट्रो, बसच्या तुलनेत चार ते पाच पट प्रवासी वाहून नेण्याची क्षमता असून, ताशी ९० किलोमीटर इतक्या वेगाने ही धावू शकते. त्यामुळे महाविकास आघाडी सरकारमध्ये उपमुख्यमंत्री असताना अजित पवार यांनी निओ मेट्रोचा विचार करावा, अशी सूचना प्रशासनाला दिली होती.

त्यानंतर तत्कालीन विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनीही पुण्यात पीएमपीच्या 'दस मे बस' सेवेच्या उद्घाटनप्रसंगी एचसीएमटीआरवर निओ मेट्रो केली जाणार असून, त्यासाठी महामेट्रो डीपीआर तयार करणार असल्याचे सांगितले. महामेट्रोने २०२२ मध्ये महापालिकेला डीपीआर सादर केला. त्यामध्ये ४ हजार ९४० कोटी रुपये खर्च दाखविण्यात आला आहे.

### सहा लेनचा रस्ता रद्द

**शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी महापालिका आणि राज्य सरकारने २०१७ मध्ये 'एचसीएमटीआर' मार्गावर एलीव्हेटेड रस्ता तयार करण्याचा निर्णय घेतला. सल्लागाराने आराखडा तयार करून दिला. त्यामध्ये खासगी वाहनांसाठी चार व बीआरटीसाठी दोन अशा सहा लेनचा २४ मीटर रुंदीचा रस्ता निश्चित केला. यासाठी महापालिकेने ५,२०० कोटी रुपयांचे पूर्वगणनपत्रक तयार केले. पण प्रत्यक्षात निविदांमध्ये खर्च १२ हजार कोटींच्या पुढे दाखविण्यात आला. 'एचसीएमटीआर' हा केवळ सार्वजनिक वाहतुकीसाठीचा रस्ता असताना त्यावर खासगी वाहनांना प्रोत्साहन नको, अशी भूमिका घेत सामाजिक संस्थांनी विरोध केला. अखेर २०२० मध्ये ही निविदा रद्द केली.**

## दहशत पसरवण्यासाठी चार ठिकाणी गोळीबार

### » तळेगाव दाभाडे येथील घटना : मावळ तालुक्यात खळबळ

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मावळ तालुक्यातील तळेगाव दाभाडे येथे चेहऱ्याला मास्क लावून दुचाकीवरून फिरणाऱ्या सहा जणांनी चार ठिकाणी गोळीबार केला. ही घटना गुरुवारी (दि. २०) रात्री सव्वाआठच्या सुमारास घडली. दीड महिन्यापूर्वी देखील गोळीबाराची घटना घडली होती. त्यानंतर पुन्हा गोळीबार झाल्याने मावळ तालुक्यात खळबळ उडाली.**

तळेगाव दाभाडे येथे सहा जणांचे टोळके हातात पिस्तूल घेऊन चेहऱ्याला मास्क लावून फिरत होते. या टोळक्याने गणपती चौक, शाळा चौक, राजेंद्र चौक, मारुती चौक या चार ठिकाणी



गोळीबार केला. शाळा चौक येथे त्यांनी दोन गोळ्या झाडल्या. उर्वरित तीन ठिकाणी प्रत्येकी एक गोळी झाडली.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांसह गुन्हे शाखेची पथके तळेगाव दाभाडे येथे दाखल झाली. घटनास्थळाच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासणी करण्यात आली. त्यावरून टोळक्याचा माग काढण्याचे काम रात्री उशिरापर्यंत सुरू होते.

### चोरट्यांनी केला होता गोळीबार...

तळेगाव दाभाडे येथे १० मे रोजी गोळीबार झाला होता. मस्करनेस कॉलनीतील एका बंगल्यात चोरी करण्यासाठी रेकी करत असलेल्या एकाला पोलिस उपनिरीक्षकाने हटकले. त्यावरून चोरट्याने थेट गोळीबार करत साथीदारासह पळ काढला.

> **“ दुचाकीवरून आलेल्या टोळक्याने हवेत गोळीबार करून परिसरात दहशत पसरवली. यामध्ये कोणीही जखमी झाले नाही. संशयीतांकडे चौकशी करण्याचे काम सुरू आहे.**
> **-देविदास घेवारे,** सहायक पोलिस आयुक्त, देहूरोड विभाग.

# विमानतळाच्या धावपट्टी विस्ताराला गती!

## केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी उचलली पावले

।पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पुणे विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार करण्यासाठी केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पावले उचण्यास सुरुवात केली आहे. विमानतळाचे संयुक्त सर्वेक्षण करण्यास परवानगी देऊन धावपट्टी विस्ताराची शक्यता तपासण्यासाठी हवाई दलाला सूचना कराव्यात, अशी विनंती संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांना मोहोळ यांनी पत्राद्वारे केली आहे. त्यामुळे पुणे विमानतळाच्या धावपट्टीच्या विस्ताराला गती मिळण्याची चिन्हे आहेत.**




मोहोळ यांनी पत्रात म्हटले आहे की, भारत सध्या जगातील तिसऱ्या क्रमांकाची देशांतर्गत हवाई वाहतूक बाजारपेठ आहे. त्यातही पुणे विमानतळ हे देशातील व्यग्र विमानतळांच्या यादीत ९ व्या क्रमांकावर आहे. गेल्या वर्षी ८० लाखांहून अधिक प्रवाशांनी पुणे विमानतळावरून प्रवास केला. भविष्यात ही वाढ कायम राखण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधांसह विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार करण्याची आवश्यकता आहे.युरोपमधील देशांसह अमेरिका, जपान या देशांशी पुण्यातून थेट आंतरराष्ट्रीय विमान सेवा नसल्यामुळे शहराच्या विकासावर गंभीर परिणाम होत आहेत. मोठ्या आकाराच्या विमानांची सेवा विमानतळावरून सुरू होण्यासाठी सध्याच्या धावपट्टीचा विस्तार करण्याची गरज आहे. हवाई दलाच्या मालकीच्या पुणे विमानतळाच्या सध्याच्या धावपट्टीचा विस्तार केल्यास मोठ्या विमानांची विमानतळावर ये-जा होऊ शकेल आणि आंतरराष्ट्रीय विमानसेवेतही वाढ होईल, असे पत्रात नमूद करण्यात आले आहे.पुणे विमानतळावरील सध्याच्या धावपट्टीची लांबी २ हजार ५३५ मीटर आणि ४५ मीटर रुंद आहे. या धावपट्टीवर एबी-३२१ प्रकारापर्यंतची विमाने उतरू शकतात. मात्र, त्यापेक्षा मोठ्या विमानांना उतरण्यासाठी धावपट्टीची लांबी वाढवावी लागणार आहे. धावपट्टीची लांबी एक हजार मीटरने वाढवावी लागणार आहे. यानंतर मोठी विमाने धावपट्टीवर उतरू शकतील आणि आंतरराष्ट्रीय विमानांची संख्याही वाढेल.पुणे हे शैक्षणिक, औद्योगिक आणि आयटी हब असल्याने या प्रस्तावामुळे शहराच्या विकासाला आणि मोठ्या प्रमाणावर अर्थव्यवस्थेला चालना मिळणार आहे.

### हजार मीटरने लांबी वाढवावी


योग्य सूचना देण्याची विनंती संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांना करण्यात आली आहे. पुणे विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार करण्यासाठी केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पावले उचण्यास सुरुवात केली आहे. विमानतळाचे संयुक्त सर्वेक्षण करण्यास परवानगी देऊन धावपट्टी विस्ताराची शक्यता तपासण्यासाठी हवाई दलाला सूचना कराव्यात, अशी विनंती संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांना मोहोळ यांनी पत्राद्वारे केली आहे. त्यामुळे पुणे विमानतळाच्या धावपट्टीच्या विस्ताराला गती मिळण्याची चिन्हे आहेत..युरोपमधील देशांसह अमेरिका, जपान या देशांशी पुण्यातून थेट आंतरराष्ट्रीय विमान सेवा नसल्यामुळे शहराच्या विकासावर गंभीर परिणाम होत आहेत. मोठ्या आकाराच्या विमानांची सेवा विमानतळावरून सुरू होण्यासाठी सध्याच्या धावपट्टीचा विस्तार करण्याची गरज आहे. हवाई दलाच्या मालकीच्या पुणे विमानतळाच्या सध्याच्या धावपट्टीचा विस्तार केल्यास मोठ्या विमानांची विमानतळावर ये-जा होऊ शकेल आणि आंतरराष्ट्रीय विमानसेवेतही वाढ होईल, असे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

# जीव धोक्यात घालून रिल्सचे चित्रीकरण!

## कात्रज पोलिसांकडून तरुण-तरुणीविरुद्ध गुन्हा दाखल

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**रिल बनवण्याच्या नादात अनेकजण जीव धोक्यात घालत असल्याचे प्रकार घडत आहेत. असाच एक प्रकार कात्रज नव्या बोगद्याजवळील दरी पुलाजवळ घडला. येथील स्वामी नारायण मंदिराजवळ असलेल्या एका बंद इमारतीच्या छतावरून तरुण-तरुणीने धोकादायकरित्या रिल बनवले. हे रिल वेगाने प्रसारित होताच भारती विद्यापीठ पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.**



यामध्ये एका बंद पडलेल्या इमारतीच्या छतावर तरुण झोपला असून त्याच्या हाताला धरून तरुणी खाली लटकताना दिसत आहे. येथून खाली पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गही दिसत आहे. या तरुणीने हाताशिवाय कशाचाच आधार घेतलेला दिसत नाही. मागील काही दिवसांत हा रिल समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात प्रसारित झाला. हा पडीक बंगला पुण्यातील स्वामी नारायण मंदिराजवळील असल्याचे दिसते. भारती विद्यापीठ पोलिसांनी याची गांभीर्याने दखल घेऊन भादंवि कलम ३३६ आणि ३३४ नुसार गुन्हा दाखल केला आहे.हा व्हिडिओ पुणे-बंगळुरू महामार्गाजवळील एका पडीक इमारतीवरून चित्रीत करण्यात आला आहे. या इमारतीवर चढून तरुण आणि तरुणी स्टंटबाजी करताना दिसत आहेत. ग्रीप स्ट्रेंथ चेक म्हणजेच हाताची पकड किती घट्ट आहे, हे तपासण्यासाठी स्टंटबाजी करत असल्याचे लिहून हा व्हिडिओ प्रसारित करण्यात आला आहे. दोन ते तीन मजली उंच इमारतीएवढ्या उंचीवरून तरुणी या तरुणाचा हात पकडून अधांतरी लटकत असल्याचे दिसत आहे. हा परिसर स्वामी नारायण मंदिराजवळ आहे. स्टंटबाजी करणाऱ्यांबरोबर त्यांचा हा स्टंट चित्रीत करणारे तरुण देखील व्हिडिओत दिसत आहेत. अनेकांनी या व्हिडिओवरून संबंधित तरुण-तरुणीवर टीका केली आहे.हा रिल पंधरा दिवसांपूर्वी बनवलेला दिसत आहे. सध्या आम्ही अज्ञात तरुण-तरुणीविरोधात गुन्हा दाखल केला आहे. समाजमाध्यमातील खात्यावरून रिल बनविणाऱ्यांचा शोध घेतला जात आहे. रिल बनवण्याच्या नादात अनेकजण जीव धोक्यात घालत असल्याचे प्रकार घडत आहेत. असाच एक प्रकार कात्रज नव्या बोगद्याजवळील दरी पुलाजवळ घडला.

### रिल समाजमाध्यमांवर प्रसारित

येथील स्वामी नारायण मंदिराजवळ असलेल्या एका बंद इमारतीच्या छतावरून तरुण-तरुणीने धोकादायकरित्या रिल बनवले. हे रिल वेगाने प्रसारित होताच भारती विद्यापीठ पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.यामध्ये एका बंद पडलेल्या इमारतीच्या छतावर तरुण झोपला असून त्याच्या हाताला धरून तरुणी खाली लटकताना दिसत आहे. येथून खाली पुणे-बंगळुरु राष्ट्रीय महामार्गही दिसत आहे. या तरुणीने हाताशिवाय कशाचाच आधार घेतलेला दिसत नाही. मागील काही दिवसांत हा रिल समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात प्रसारित झाला. हा पडीक बंगला पुण्यातील स्वामी नारायण मंदिराजवळील असल्याचे दिसते.

# आषाढीवारी पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी महापालिका सज्ज!

## आयुक्त राहुल महिवाल यांच्याकडून पालखी मार्गाची पाहणी

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आषाढीवारी पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी महापालिका सज्ज असून पालखी मार्गावर, मुक्कामाच्या ठिकाणी तसेच वारकऱ्यांना पुरविण्यात येणाऱ्या सोयीसुविधांची तयारी अंतिम टप्प्यात आली असल्याची माहिती आयुक्त राहुल महिवाल यांनी दिली.**



संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरु संत तुकाराम महाराज आषाढीवारी पालखी सोहळ्याचे आगमन येत्या काही दिवसांत पिंपरी चिंचवड शहरात होणार आहे. जगद्गुरु संत तुकाराम महाराज आषाढीवारी पालखी सोहळा स्वागत कक्ष आणि मुक्कामाच्या स्थळाची तसेच संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा मार्ग, विसाव्याचे ठिकाण तसेच महापालिकेच्या वतीने उभारण्यात येणा-या स्वागत कक्षाच्या ठिकाणाची पाहणी आयुक्त राहुल महिवाल यांनी केली

या पाहणी दौऱ्यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, सहशहर अभियंता ज्ञानदेव जुंधारे, संजय कुलकर्णी, प्रमोद ओंभासे, बाबासाहेब गलबले, उपआयुक्त रविकिरण घोडके, मनोज लोणकर, संदीप खोत, अण्णा बोदडे, निलेश भदाणे, क्षेत्रीय अधिकारी सुचेता पानसरे, सिताराम बहुरे, उमेश ढाकणे, राजेश आगळे, सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात, यशवंत डांगे, मुकेश कोळप, विनोद जळक, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे तसेच संबंधित विभागांचे अधिकारी, कार्यकारी अभियंता, उपअभियंता आणि कर्मचारी उपस्थित होते.

आषाढीवारी पालखी सोहळ्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने देण्यात येणाऱ्या सेवा सुविधांमध्ये कोणत्याही प्रकारची कमतरता राहणार नाही याची दक्षता घेण्यात येत असून सर्वांच्या समन्वयाने वारकऱ्यांना पुरविण्यात येणाऱ्या सोयीसुविधांचे नियोजन करण्यात येत आहे.

निगडी येथील भक्ती शक्ती याठिकाणी महापालिकेच्या वतीने स्वागतकक्ष उभारला जातो. येथे करण्यात येणाऱ्या व्यवस्थेबद्दलची माहिती पाहणीदरम्यान राहुल महिवाल यांनी घेतली. आकुर्डी येथील विठ्ठल मंदीरामध्ये जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखीचा मुक्काम असतो. आकुर्डी येथील मौलाना अबुल कलाम आजाद उर्दू माध्यमिक विद्यालय येथे दिंड्यांचा मुक्काम असतो. याठिकाणी शाळांमध्ये करण्यात येणाऱ्या सोयीसुविधांचा आढावा त्यांनी यावेळी घेतला. खराळवाडी येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर, नाशिक फाटा रोड, दापोडी येथील पालखी विसावा आदी ठिकाणीही त्यांनी पाहणी केली.

पावसाळ्याच्या अनुषंगाने आवश्यक आपत्ती व्यवस्थापनासाठी लागणारी यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. सर्व होर्डिंग्जची पाहणी करून योग्य कार्यवाही करण्यात येत आहे, विविध ठिकाणी दिशादर्शक फलक दर्शनी भागात लावण्यात येणार आहेत. पालखी मार्गावर महत्वाच्या ठिकाणी स्वतंत्र समन्वयकाची नेमणूक देखील करण्यात आली आहे.

पिण्याचे पाणी, तातडीच्या वैद्यकीय सुविधेसाठी महापालिकेच्या वतीने रुग्णवाहिका तसेच पालखी मुक्काम, वारकरी निवास आणि पालखी मार्गावर पुरेशा प्रमाणात फिरते शौचालयांची व्यवस्था करण्यात येणार आहे. तसेच कार्यक्षेत्रातील नदीतून जलपर्णी काढण्याचे कामही प्रगतीपथावर आहे. पालखी मार्गावर पावसाचे पाणी कोठेही तुंबणार नाही याची दक्षता घेण्यात येणार आहे. तसेच पालखी मार्गाची वेळोवेळी पाहणी करुन खड्डे बुजविण्याची कार्यवाही सुरू आहे. पालखी मुक्कामाच्या ठिकाणी असलेल्या पार्कीगच्या जागी पार्कींग संदर्भातील फलक तसेच महापालिकेमार्फत वारक-यांकरिता पुरविण्यात येणा-या सुविधां संदर्भातील फलक लावण्यात येणार आहेत. पालखी मुक्कामाच्या ठिकाणी कंट्रोल रुम उभारण्यात येणार आहे. याव्यतिरिक्त, वारकऱ्यांच्या मुक्कामाच्या ठिकाणी योग्य त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असून मुक्कामाच्या ठिकाणी रस्त्यावरील तसेच पालखी मार्गावरील राडारोडा उचलण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. पालखीच्या मार्गावर व कार्यक्रमांच्या ठिकाणी, मुक्कामाच्या व विसाव्याच्या ठिकाणी साफसफाई, जंतुनाशक फवारणी करण्यात येणार आहे.

### सुरक्षेच्या दृष्टीने ड्रोन कॅमेऱ्यांची व्यवस्था

पालखी मार्गावर तसेच मुक्काम आणि विसाव्याच्या ठिकाणी सॅनिटरी नॅपकीन वेंडींग व सॅनिटरी नॅपकीन बर्निंग मशीन ठेवण्यात येणार आहेत. तसेच पालखी सोहळा कालावधीत वारकऱ्यांसाठी महापालिकेच्या दवाखान्यात मोफत वैद्यकिय सुविधा २४ तास उपलब्ध करुन देण्यात येणार असून फिरता दवाखानाही उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. पालखी मुक्काम, विसावा, स्वागत कक्ष आणि पालखी मार्गावर योग्य त्या ठिकाणी सी.सी.टि.व्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. तसेच सुरक्षेच्या दृष्टीने ड्रोन कॅमेऱ्यांची व्यवस्थाही करण्यात येणार आहे.

---

# संदीप वाघेरे हे क्रियाशील नेतृत्व : खासदार श्रीरंग बारणे

## पिंपरीत 1445 गुणवंत विद्यार्थ्यांना शालेय साहित्यांचे वाटप

। पिंपरी। प्रतिनिधी : महाईन्यूज

**गेली अनेक वर्षे सामाजिक बांधिलकीच्या नात्यातून विद्यार्थ्यांचे कौतुक करण्याचे काम नगरसेवक संदीप वाघेरे करीत आहेत. सलग १४ वर्षे अविरतपणे चालणाऱ्या या उपक्रमांचे कौतुक करीत संदीप वाघेरे हे क्रियाशील नेतृत्व आहेत असे गौरवोद्गार खासदार श्रीरंग बारणे यांनी काढले. तसेच विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम करावेत तरच भविष्याची वाटचाल सुकर होऊ शकते कोणत्याही क्षेत्रात नावलौकिक मिळविण्यासाठी सातत्य ठेवणे गरजेचे असल्याचं खासदार बारणे म्हणाले.**




पिंपरी येथील संदीप वाघेरे युवामंचच्या वतीने आयोजित इयत्ता दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ तसेच इयत्ता जुनिअर के. जी. ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्य वाटप समारंभ उत्साहात संपन्न झाला. विद्यार्थ्यांनी केलेल्या चमकदार कामगिरीचे सर्वच मान्यवरांनी भरभरून कौतुक केले. कार्यक्रमा दरम्यान विद्यार्थ्यांना जेष्ठ विचारवंत करियर मार्गदर्शन व्याख्याते श्री.वसंतजी हंकारे (सर) यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी इयत्ता १० वीच्या गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये अभिनव बालन या विद्यार्थ्यास लॅपटॉप, श्रद्धा जगदाळे व सोमा सृष्टी यांना टॅब, दीक्षा कापसे व यश मदने या विद्यार्थ्यांना स्कूल बॅग देण्यात आले. तसेच इयत्ता १२ वीच्या मास्करेंस श्रेयल या विद्यार्थीनीस लॅपटॉप तसेच आछरा चारू व भूमिका हुंदलानी यांना टॅब पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. तसेच इयत्ता ज्युनिअर केजी ते इयत्ता ८ वीच्या सुमारे १४४५ गरीब गरजू वियार्थ्यांना मोफत शालेय साहित्य (वह्या कंपास) चे वाटप करण्यात आले.

### वचननाम्यातील सर्व कामे पूर्ण केल्याचा सार्थ अभिमान

गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्याचे सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले. यावेळी संदिप वाघेरे युवा मंचच्या वतीने वर्षभरात होणाऱ्या विविध उपक्रमांची नगसेवक संदिप वाघेरे यांनी दिली. पिंपरी व पिंपरी परीसरातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी मी सदैव कसोशीने प्रयत्न करत असतो. याच बरोबर कला, क्रीडा, सांस्कृतिक कार्यक्रम घेवून परिसरातील विविध क्षेत्रातील प्रोत्साहन देण्याचे काम वर्षभर सुरु असते. याचबरोबर मागील ७ वर्षामध्ये जनसेवा हीच ईश्वरसेवा मानून मी दिलेले वचननाम्यातील सर्व कामे पूर्ण केल्याचा मला व माझ्या सहकार्यांना सार्थ अभिमान आहे.

# बँकबुडी आता तरी थांबावी!



भूमिका

**खासगी क्षेत्रातील काही बँका बुडता बुडता वाचल्या. किंबहुना वाचवल्या गेल्या. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांची पाच वर्षांपूर्वीपर्यंत २७ असलेली संख्या, विलीनीकरण, एकत्रीकरण करून १२ वर आली. गेल्या अर्धशतकात देशातील कोणतीही व्यापारी बँक बुडालेली नाही. नेमकी या उलट स्थिती लोकांनी एकत्र येत उभारलेल्या सहकारी बँकांत आहे.**

अगदी अलीकडेपर्यंत नियमितपणे ज्या बँका बुडाल्या त्या सर्व सहकारातल्याच, बँक डबघाईला आली आणि तिला बुडण्यापासून वाचवले गेले असे उदाहरण सहकारी बँकांबाबत अपवाद म्हणूनही सापडत नाही. मुंबईतील पीएमसी बँकेचा किस्सा तर पार दिल्लीपर्यंत गाजला. केंद्राने खडबडून जागे होत हालचाली केल्या. नागरी सहकारी बँकांचे नियंत्रण थेट रिझर्व्ह बँकेकडे आले. केंद्रीय सहकार मंत्रालयाचा कारभार ‘शक्तिमान’ नेत्याहातून सुरू झाला. पण परवाना रद्द करण्यात आलेल्या नागरी सहकारी बँकांची संख्या घटली नाही, ती तब्बल ४२ वर पोहोचली. कोणी म्हणेल, चौदाशे-पंधराशे नागरी बँकांत, इतक्याशा बुडाल्या तर एवढा गहजब का? पण ज्याचे जळते त्यालाच कळेल. अधिक व्याजदराच्या आमिषाने म्हणा किंवा विश्वास अथवा सोय पाहता म्हणा, जीवनभर कष्टाने कमावलेले आणि निवृत्तीनंतरची



सोय असलेले ३०-४० लाख अकस्मात बुडाल्याच्या वृत्ताचा ज्येष्ठांना बसणारा धक्का किती मोठा असेल, याची इतरांना कल्पनाही करता येणार नाही. विम्याने संरक्षित पाच लाखांच्या भरपाईने भरून निघणारा हा घाव नक्कीच नाही.स्वातंत्र्यपूर्व काळापासून देशउभारणीच्या भावनेने सहकारी बँकांच्या पायाभरणीचा प्रदीर्घ इतिहास असलेल्या महाराष्ट्राचा म्हणूनच या संबंधाने कळवळा समर्पक. राज्य सरकारनेही तत्परता दाखवली व संकटग्रस्त नागरी सहकारी बँकांना वाचविण्याच्या धडपडीतून डिसेंबर २०२३ मध्ये तज्ज्ञ समिती गठित केली. नागरी सहकारी बँकिंगचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या सदस्यांसह, ज्येष्ठ बँकिंग अभ्यासक विद्याधर अनास्कर यांच्या अध्यक्षतेखालील या समितीने अभ्यासपूर्ण अहवाल तयारही केला. यातील शिफारसी अत्यंत व्यवहार्य आहेत. देशासाठी अनुकरणीय अशा आणखी एका पायंड्याची रुजवात करण्याची ही संधी असेल. अडचणीच्या काळात नागरी बँकांना पैसा उभारण्याचे स्रोत मर्यादित आहेत. अशा वेळी त्यांना आवश्यक तरलता पुरवण्याच्या उपायांवर तज्ज्ञ समितीची मोलाची शिफारस आहे. ती म्हणजे गुजरातच्या धर्तीवर ‘बँक सहायता महामंडळा’ची निर्मिती महाराष्ट्रातही करता येईल. प्रत्येक नागरी बँक नफ्यातून विशिष्ट रक्कम ठेवीदार संरक्षण निधी म्हणून जमा करेल आणि तेवढाच निधी राज्य सरकारकडून दिला जाईल. यातून डबघाईला आलेल्या बँकांना स्वस्त दरात तरलता पुरवली जाईल आणि त्या संकट टाळू शकतील. राज्यातील जिल्हा बँकांसह सुमारे ४७५ नागरी सहकारी बँकांकडून एक हजार कोटी आणि राज्य सरकारचे तेवढेच योगदान धरून दोन हजार कोटींचा कोष सहाय्यकारी ठरू शकेल. ‘बँक बोर्ड ब्यूरो’च्या धर्तीवर राज्यातील नागरी सहकारी बँकांसाठी एक स्वायत्त मंडळ कार्यान्वित करण्याची समितीची शिफारस आहे. हे मंडळ अर्थात ‘स्वतंत्र सर्व्हिस सोसायटी’ ही बँकांच्या व्यवहारात व्यावसायिकता आणण्यासह, त्यांची भांडवल उभारणी, जोखीम मूल्यांकन व व्यवस्थापन ते विलीनीकरणापर्यंत साहाय्यभूत ठरेल. राज्यातील सहकारी बँकांनी आपापल्या भांडवलाच्या प्रमाणात या संस्थेच्या भांडवलात गुंतवणूक केल्यास, किमान ५० कोटींची गुंतवणूक होईल. राज्याकडूनही समान गुंतवणूक झाल्यास १०० कोटींच्या भांडवलासह हे मंडळ अत्यंत प्रभावी होईल. व्यापारी बँकांना त्यांची थकलेली कर्ज ही मालमत्ता पुनर्बांधणी संस्थांना (एआरसी) विकण्याची सोय आहे. सहकारी बँकांच्या वतीने हे मंडळ ‘एआरसी’चे देखील काम करू शकेल. सहकार कायदा हा सहकारी संस्थांच्या सभासदांभोवती केंद्रित आहे, मात्र अशा संलग्न सभासदांव्यतिरिक्त ठेवीदारांचा मोठा वर्ग असतो. त्याच्या हितरक्षणार्थ या कायद्यात तरतुदी नाहीत. राज्याच्या सहकार कायद्यात केवळ नागरी बँकांसाठी स्वतंत्र उपकायदा करावा, असे समितीने सुचविले आहे. एकुणात सहकाराचे तत्त्व बळकट व्हावे.

## प्रासंगिक »

### मृगजळ...

***गेला आठवडा युक्रेनच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा होता. या आठवड्याच्या मध्यावर रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी युद्धविरामाचा एकतर्फी प्रस्ताव मांडला.***

गेला आठवडा युक्रेनच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा होता. या आठवड्याच्या मध्यावर रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी युद्धविरामाचा एकतर्फी प्रस्ताव मांडला. प्रस्ताव सादर करतानाच तो मान्य होण्याची शक्यता शून्य, याची पुतिन यांना पुरेपूर कल्पना असणार. भूभागांच्या स्वामित्वाची विद्यमान स्थिती मान्य असल्यास युद्धविराम घडून येऊ शकतो, असा तो प्रस्ताव. तसे झाल्यास रशियाकडून घुसखोरी झालेले युक्रेनचे चार प्रांत आणि क्रायमिया म्हणजे २० टक्क्यांहून अधिक जमिनीवर पाणी सोडावे लागणार. २४ फेब्रुवारी २०२२ रोजी सुरू झालेल्या युद्धात हजारो नागरिकांचे प्राण गेल्यानंतर, लाखो बेघर झाल्यानंतर आणि अपरिमित वित्तहानी झाल्यानंतर युक्रेन त्यास मान्यता देणार नाही हे पुतिन यांना पक्के ठाऊक होते. पण युद्धविरामासाठी आपण प्रयत्नच केला नाही.

फारसे काही कारण नसतानादेखील वाद निर्माण करणे ही चीनची सवय आहे. तैवानचे अध्यक्ष लाई चिंग ते यांनी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निवडणुकीत मिळालेल्या विजयाबद्दल अभिनंदन संदेश पाठवला, हे चीनला पसंत पडलेले नाही. दोन देशांच्या नेत्यांनी परस्परांना औपचारिक संदेश पाठवणे ही सामान्य प्रथा आहे.

## तैवानने मोदींचे अभिनंदन केले, चीनचे काय बिघडले?

लाई चिंग यांनी पाठवलेल्या अभिनंदनपर संदेशाबद्दल नरेंद्र मोदी यांनी त्यांचे आभार मानले. त्यामुळे चीनच्या संतापात अधिकच भर पडली.रिपब्लिक ऑफ चायना (तैवान) हा पीपल्स रिपब्लिक ऑफ चायनाचा अविभाज्य भाग असल्याची चीनची सुरुवातीपासून म्हणजे १९४९ पासून भूमिका आहे. तैवानवर आपण लवकरच कब्जा मिळवू, असे चीन सतत सांगत असतो. अलीकडे तैवानच्या सीमेजवळ चीन मोठ्या संख्येत आपली लढाऊ विमाने आणि जहाजे पाठवून तैवानच्या नागरिकांमध्ये भीती निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. लाई चिंग यांनी गेल्या महिन्यात राष्ट्राध्यक्षपदाची शपथ घेतल्यानंतर चीनला धमक्या देणे बंद करण्याची विनंती केली होती. तैवानचे नागरिक मात्र चीनच्या अशा धमक्यांना घाबरत नाहीत. अमेरिकेसह अनेक पाश्चात्य राष्ट्रांची भूमिका तैवानला मदत करण्याची आहे. मात्र, तैवानने मागविलेली शस्त्रे पुरविण्यात अमेरिकेकडून विलंब होत आहे.भारत आणि तैवानमध्ये औपचारिक



राजनैतिक संबंध नाहीत. पण, त्याचा अर्थ दोन्ही देशांत संबंधच नाहीत असा होत नाही. भारताप्रमाणेच अन्यही अनेक राष्ट्रांचे तैवानशी औपचारिक राजनैतिक संबंध नाहीत. नवी दिल्लीत १९९५ पासून तैवानचे ‘तैपेई इकॉनॉमिक अँड कल्चरल सेन्टर’ कार्यरत आहे. उभय देशांत राजनैतिक संबंध नसल्याने त्या कार्यालयाला एम्बेसी म्हणता येत नाही. पण, एम्बेसीसारखे काम या कार्यालयातून केले जाते. व्हिसा देण्यापासून व्यापार इत्यादी कामे तिथून केली जातात. तैवानची राजधानी तैपेई येथेदेखील भारताचे ‘इंडिया तैवान असोसिएशन’ आहे आणि तेदेखील अशा स्वरुपाची कामे करते. भारत आणि तैवानचे संबंध मैत्रीपूर्ण आहेत. व्यापार व्यवसायासाठी अनेक भारतीय तिथे राहतात. दोन ते अडीच हजार भारतीय विद्यार्थी तिथे वैद्यकीय शिक्षण घेत आहेत. जगात सेमी-कंडक्टरमध्ये तैवान इतर राष्ट्रांच्या खूप पुढे आहे. भारत मोठ्या प्रमाणात सेमी-कंडक्टरची आयात तैवान, चीन, कोरियातून करतो. तैवानच्या जवळपास २२८ कंपन्यानी फेब्रुवारी २०२४ पर्यंत भारतात ४.४६ अब्ज डॉलर एवढी गुंतवणूक केली आहे. दोन्ही देशांत गेल्या वर्षी ८.२ अब्ज डॉलर एवढ्या रकमेच्या वस्तूंचा परस्पर व्यापार झाला होता. त्यापैकी सहा अब्ज डॉलरच्या वस्तूंची भारताने आयात केली होती. चीनशी आपले संबंध तणावाचे असले तरी चीनमधून मोठ्या प्रमाणात आयात केली जाते. आश्चर्य म्हणजे चीनचे राष्ट्राध्यक्ष क्षि जिनपिंग यांनी मोदी यांना विजयाबद्दल अभिनंदन संदेश पाठवला नाही. चीनचे पंतप्रधान लि क्विंग यांनी मोदींचे अभिनंदन केले. पाकिस्तान आणि बांगलादेशच्या पंतप्रधानांचे मात्र त्यांच्या विजयाबद्दल क्षि जिनपिंग यांनी स्वत: अभिनंदन केले होते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील)
एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# हरित महामार्गाला जमिनी देण्यास विरोध!

## हरित महामार्गासाठीही सोलापूर जिल्ह्यातून जमिनींचे संपादन

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सोलापूर जिल्ह्यातून जाणाऱ्या सुरत-चेन्नई ग्रीन कॉरिडॉर महामार्गाप्रमाणे नागपूर-गोवा शक्तिपीठ महामार्गासाठी जमिनी देण्यास शेतकऱ्यांचा विरोध वाढत आहे. या प्रश्नावर पुनःश्च आंदोलनाची शेतकऱ्यांची मानसिकता दिसत असताना राजकीय नेते विशेषतः सत्ताधारी पक्षाच्या लोकप्रतिनिधींसह नेत्यांनी मौन बाळगल्याचे पाहावयास मिळते.**




अन्य जिल्ह्यांतून तीव्र विरोध होऊन त्याचा फटका तेथील लोकसभा निवडणुकीत सत्ताधा-यांना बसला आहे. परंतु इकडे सोलापूर जिल्ह्यात राजकीय क्षेत्रात थंडपणा दिसत असताना अखेर आता प्रकल्प बाधित शेतकऱ्यांनी एकत्र येऊन आंदोलनाची तयारी हाती घेतली आहे. या शक्तिपीठ महामार्गासाठी जिल्ह्यातील बार्शी, उत्तर सोलापूर, मोहोळ, मंगळवेढा, सांगोला या तालुक्यातील जमिनी संपादित होणार आहेत. यापूर्वीही चारपदरी महामार्गासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी बाधित झाल्या असताना आता पुन्हा नव्याने शक्तिपीठ द्रुतगती महामार्गासाठी संपादित होणा-या जमिनी दिल्यास जमिनी कमी होतील. शिवाय, या जमीन संपादनासाठी दिला जाणारा मोबदला तुलनेने आहे. योग्य आणि वाढीव मोबदला दिला नाही तर या प्रकल्पासाठी एक इंचसुध्दा जमीन देणार नाही, असा इशारा बाधित शेतकऱ्यांच्या मेळाव्यात देण्यात आला. मोहोळ येथे शेकापचे नेते डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या मेळाव्यास सोलापूर जिल्हा काँग्रेस किसान सेलचे अध्यक्ष प्रा. संग्राम चव्हाण, दिगंबर कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. नागपूर-गोवा या दरम्यान सध्याचे प्रचलित नव्याने बांधलेला सहा पदरी महामार्ग अस्तित्वात असताना पुन्हा ८६ हजार कोटी रूपये खर्च करून नवा शक्तिपीठ द्रुतगती महामार्ग बांधण्याची गरजच काय ?

सरकारला कंत्राटदारांची घरे भरायची आहेत काय, असा सवाल डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी उपस्थित केला. जर जमिनी संपादित करायच्या असतील तर बाधित शेतकऱ्यांना जमीन व पिकांचा योग्य मोबदला म्हणजे एकरी दोन कोटी रूपयांचा मोबदला द्यावा, अशी मागणीही त्यांनी केली.शक्तिपीठ द्रुतगती महामार्गासह सुरत-चेन्नई हरित महामार्गासाठीही सोलापूर जिल्ह्यातून जमिनींचे संपादन होत आहे. जिल्ह्यात या हरित महामार्गाची लांबी १५१ किलोमीटर आहे. बार्शी, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर व अक्कलकोट या चार तालुक्यांतील मिळू ६१ गावांतील जमिनी संपादित होत आहेत. यात ६७८ प्रकरणांमध्ये भूसंपादनासाठी ५३४ कोटींचा निधी मंजूर झाला आहे. बार्शी, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर भागात काही बाधित शेतकऱ्यांना २९५ कोटींचा मोबदला देण्यात आला आहे. आणखी १७८ प्रकरणे प्रलंबित आहेत. यात अक्कलकोटच्या १७ गावांतील बाधित शेतक-यांचा भूसंपादनास विरोध आहे. या शेतक-यांचा विरोध डावलून पोलीस बंदोबस्तात जमिनी संपादित करण्याचे आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले आहेत. अक्कलकोटमध्ये या प्रश्नावर बाधित शेतकऱ्यांच्या भावना तीव्र असून तेथे आंदोलन होत आहे. नवीन महामार्गासाठी पून्हा जमिनी देण्यास सोलापूरच्या शेतक-यांचा विरोध असताना जवळपास सत्ताधारी पक्षाचे असलेले सर्व स्थानिक लोकप्रतिनिधी या प्रश्नावर मौन बाळगून आहेत. अक्कलकोटचे भाजपचे आमदार सचिन कल्याणशेट्टी, दक्षिण सोलापूरचे भाजपचे आमदार सुभाष देशमुख, मोहोळचे राष्ट्रवादी अजितपवार गटाचे आमदार यशवंत माने, बार्शीचे भाजपचे सहयोगी अपक्ष आमदार राजेंद्र राऊत, सांगोल्याचे शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे आमदार ॲड. शहाजीबापू पाटील हे काहीही भाष्य करायला तयार नाहीत. आमदार राजेंद्र राऊत यांनी मात्र या प्रकल्पाला काही शेतक-यांचा विरोध आहे तर काही शेतक-यांचा नवीन महामार्ग व्हावा, असे वाटते. असल्याचे सांगितले. नागपूर-गोवा शक्तिपीठ महामार्गाला कोल्हापूरसह अन्य जिल्ह्यांतून तीव्र विरोधसत्ताधा-यांना बसला आहे. परंतु इकडे सोलापूर जिल्ह्यात राजकीय क्षेत्रात थंडपणा दिसत असताना अखेर आता प्रकल्प बाधित शेतकऱ्यांनी एकत्र येऊन आंदोलनाची तयारी हाती घेतली आहे.

### दोन कोटी रूपयांचा मोबदला द्यावा

या शक्तिपीठ महामार्गासाठी जिल्ह्यातील बार्शी, उत्तर सोलापूर, मोहोळ, मंगळवेढा, सांगोला या तालुक्यातील जमिनी संपादित होणार आहेत. यापूर्वीही चारपदरी महामार्गासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी बाधित झाल्या असताना आता पुन्हा नव्याने शक्तिपीठ द्रुतगती महामार्गासाठी संपादित होणा-या जमिनी दिल्यास जमिनी कमी होतील. शिवाय, या जमीन संपादनासाठी दिला जाणारा मोबदला तुलनेने आहे. योग्य आणि वाढीव मोबदला दिला नाही तर या प्रकल्पासाठी एक इंचसुध्दा जमीन देणार नाही, असा इशारा बाधित शेतकऱ्यांच्या मेळाव्यात देण्यात आला. मोहोळ येथे शेकापचे नेते डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या मेळाव्यास सोलापूर जिल्हा काँग्रेस किसान सेलचे अध्यक्ष प्रा. संग्राम चव्हाण, दिगंबर कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. नागपूर-गोवा या दरम्यान सध्याचे प्रचलित नव्याने बांधलेला सहा पदरी महामार्ग अस्तित्वात असताना पुन्हा ८६ हजार कोटी रूपये खर्च करून नवा शक्तिपीठ द्रुतगती महामार्ग बांधण्याची गरजच काय ? सरकारला कंत्राटदारांची घरे भरायची आहेत काय, असा सवाल डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी उपस्थित केला. जर जमिनी संपादित करायच्या असतील तर बाधित शेतकऱ्यांना जमीन व पिकांचा योग्य मोबदला म्हणजे एकरी दोन कोटी रूपयांचा मोबदला द्यावा

# बारामतीत आता काका-पुतण्यात थेट लढत होणार?

## विधानसभेच्या उमेदवारीवरून युगेंद्र पवारांचं सुचक वक्तव्य!

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभेची निवडणूक संपल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार हे तीन दिवसांच्या बारामती लोकसभा मतदारसंघाच्या दौऱ्यावर होते.**



या दौ-यादरम्यान बारामतीमधील काही कार्यकर्त्यांनी शरद पवार यांची भेट घेत मोठी मागणी केली आहे. आम्हाला आता बारामतची दादा बदलायचा आहे, अशी कार्यकर्त्यांनी मागणी केली आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत बारामतीतून काका-पुतण्या यांची थेट लढत असणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. यावरून खुद्द युगेंद्र पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी आज माध्यमांशी संवाद साधला."मला संधी मिळाली अशी कार्यकर्त्यांची इच्छा आहे. ते मला सांगून असं काही करत नाहीत. त्यांनाही थांबा असंही बोलता येत नाही. त्यांच्यात उत्साह असतो. त्यांनाही काही काही करायचं असतं. आता मी साहेबांबरोबर खूप फिरलोय. आताही फिरतोय. मलाही माझ्या कुटुंबाशी बोलावं लागेल. शरद पवार पक्षाचे अध्यक्ष आहेत, परंतु, जयंत पाटील, सुप्रिया सुळेंशी बोलून चर्चा करून पुढे बघू", अशी सूचक प्रतिक्रिया युगेंद्र पवार यांनी दिली आहे. त्यांच्या बोलण्यावरून तेही उमेदवारीसाठी इच्छुक असल्याचं स्पष्ट होतंय. आम्हाला आता बारामतीचा दादा बदलायचा आहे. बारामतीत शांत दादा आणायचा आहे. गाव पुढाऱ्यांपुढे आमचं काही चालत नाही. युगेंद्र पवारांना संधी द्या, आमचं त्यांच्यावर लक्ष आहे, पण तुमचंही लक्ष असूद्या एवढीच आमची इच्छा आहे. त्यांना तुम्ही ताकद द्या, आम्ही सर्वजण त्यांच्या पाठीशी आहोत. आम्हाला बारामतीचा दादा बदलायचा आहे", अशी मागणी कार्यकर्त्यांनी यावेळी शरद पवारांकडे केली. "उमेदवारीची चर्चा आता करु नका. लवकरच काय ते होईल. संयमी राहा", असा सल्ला शरद पवारांनी कार्यकर्त्यांना दिला.

### कोण आहेत युगेंद्र पवार?

दरम्यान, लोकसभेच्या निवडणुकीसारखं विधानसभेच्या निवडणुकीत बारामतीमध्ये पुन्हा एकदा पवार विरुद्ध पवार अशी लढत होणार का?, २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत अजित यांनी १.९५ लाख मतांनी मतदारसंघ जिंकला होता. १९९१ पासून सात्यत्याने विजय मिळवत आलेल्या अजित पवारांना पुतण्याकडून मात मिळणार का? याबाबत आता बारामतीच्या राजकारणात चर्चा रंगताना पाहायला मिळत आहेत.

# लवकरच राज्यात विधानसभा निवडणुका

## जम्मू आणि काश्मीरमध्ये पंतप्रधान मोदींची मोठी घोषणा

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पंतप्रधान नरेंद्र मोदी जम्मू आणि काश्मीरच्या दौऱ्यावर आहेत. यावेळी त्यांनी श्रीनगर येथे बोलताना मोठी घोषणा केली. लवकरच राज्यात विधानसभा निवडणुका घेण्यासंदर्भात तयारी केली जात असल्याचे सुतोवाच त्यांनी केले. केंद्रशासित प्रदेशात आता लवकरच स्वतःचे सरकार स्थापन होऊ शकते, असेही ते म्हणाले. तिसऱ्यांदा पंतप्रधान झाल्यानंतर मोदींचा हा काश्मीरमधील पहिलाच दौरा आहे. दोन दिवसांच्या दौऱ्यातील पहिल्या दिवशी त्यांनी शेर-ए-काश्मीर आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्स सेंटर (SKICC) या संमेलनाला संबोधित केले. यावेळी त्यांनी जम्मू आणि काश्मीरमध्ये अलीकडे झालेल्या दहशतवादी हल्ल्यांचाही उल्लेख केला. शांततेच्या विरोधी शत्रूंना धडा शिकवला जाईल, असा इशारा त्यांनी दिला.**



पंतप्रधान मोदी म्हणाले की, राज्यात विधानसभा निवडणुका घेण्याची तयारी सुरू झाली आहे तो दिवस आता दूर नाही, जेव्हा राज्यातील लोक स्वतःचे सरकार निवडण्यासाठी मतदान करतील. तसेच तो दिवसही आता दूर नाही, जेव्हा जम्मू आणि काश्मीर राज्य म्हणून स्वतःचे भविष्य ठरवेल.पंतप्रधान मोदी गुरुवारी संध्याकाळी श्रीनगरमध्ये दाखल झाले. सर्वात आधी त्यांनी SKICC च्या संमेलनातील प्रदर्शनाला भेट दिली. यावेळी विविध स्टार्टअप्सनी लावलेले स्टॉलची पाहणी केली. त्यानंतर पायाभूत सुविधा, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्राशी संबंधित १५०० कोटींच्या ८४ प्रकल्पांचे भूमीपूजन पंतप्रधान मोदींनी केले. तसेच विविध सरकारी विभागात नोकरी मिळालेल्या २००० लोकांना प्रतिकात्मकरित्या नियुक्तीपत्र दिले. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत काश्मीरच्या जनतेने लोकशाहीचा झेंडा उचलून धरला, याबाबत मी व्यक्तिशः येथील जनतेचे आभार व्यक्त करतो. "तुमच्यामुळे लोकशाहीचा विजय झाला. मागच्या ३५ ते ४० वर्षांतील मतदानाचे सर्व रेकॉर्ड तुम्ही मोडीत काढले. यावरूनच दिसते की, राज्यातील जनतेचा लोकशाहीवर गाढा विश्वास आहे. यासाठीच मी काश्मीर खोऱ्यातील लोकांचे आभार व्यक्त करण्यासाठी आलो आहे", अशा शब्दात पंतप्रधान मोदींनी लोकांचे आभार मानले. दहशतवादाविरोधात भूमिका मांडताना पंतप्रधान मोदी म्हणाले, "अलीकडच्या काळात राज्यात काही दहशतवादी हल्ले झाले आहेत. आम्ही हे हल्ले गांभीर्याने घेतले असून केंद्रीय गृहमंत्र्यांनी आढावा बैठक घेतली आहे. मी तुम्हाला आश्वस्त करतो की, शांततेच्या शत्रूंना योग्य तो धडा शिकविला जाईल. जम्मू आणि काश्मीरमधील नवी पिढी शांततेत जीवन व्यतीत करेल, हा शब्द मी तुम्हाला देतो."पंतप्रधान मोदी म्हणाले की, राज्यात विधानसभा निवडणुका घेण्याची तयारी सुरू झाली आहे तो दिवस आता दूर नाही, जेव्हा राज्यातील लोक स्वतःचे सरकार निवडण्यासाठी मतदान करतील. तसेच तो दिवसही आता दूर नाही, जेव्हा जम्मू आणि काश्मीर राज्य म्हणून स्वतःचे भविष्य ठरवेल.पंतप्रधान मोदी गुरुवारी संध्याकाळी श्रीनगरमध्ये दाखल झाले. सर्वात आधी त्यांनी SKICC च्या संमेलनातील प्रदर्शनाला भेट दिली. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत काश्मीरच्या जनतेने लोकशाहीचा झेंडा उचलून धरला, याबाबत मी व्यक्तिशः येथील जनतेचे आभार व्यक्त करतो.

### नवी पिढी शांततेत जीवन व्यतीत करेल

"तुमच्यामुळे लोकशाहीचा विजय झाला. मागच्या ३५ ते ४० वर्षांतील मतदानाचे सर्व रेकॉर्ड तुम्ही मोडीत काढले. यावरूनच दिसते की, राज्यातील जनतेचा लोकशाहीवर गाढा विश्वास आहे. यासाठीच मी काश्मीर खोऱ्यातील लोकांचे आभार व्यक्त करण्यासाठी आलो आहे", अशा शब्दात पंतप्रधान मोदींनी लोकांचे आभार मानले. दहशतवादाविरोधात भूमिका मांडताना पंतप्रधान मोदी म्हणाले, "अलीकडच्या काळात राज्यात काही दहशतवादी हल्ले झाले आहेत. आम्ही हे हल्ले गांभीर्याने घेतले असून केंद्रीय गृहमंत्र्यांनी आढावा बैठक घेतली आहे. मी तुम्हाला आश्वस्त करतो की, शांततेच्या शत्रूंना योग्य तो धडा शिकविला जाईल. जम्मू आणि काश्मीरमधील नवी पिढी शांततेत जीवन व्यतीत करेल, हा शब्द मी तुम्हाला देतो."पंतप्रधान नरेंद्र मोदी जम्मू आणि काश्मीरच्या दौऱ्यावर आहेत. यावेळी त्यांनी श्रीनगर येथे बोलताना मोठी घोषणा केली. लवकरच राज्यात विधानसभा निवडणुका घेण्यासंदर्भात तयारी केली जात असल्याचे सुतोवाच त्यांनी केले. केंद्रशासित प्रदेशात आता लवकरच स्वतःचे सरकार स्थापन होऊ शकते, असेही ते म्हणाले. तिसऱ्यांदा पंतप्रधान झाल्यानंतर मोदींचा हा काश्मीरमधील पहिलाच दौरा आहे. दोन दिवसांच्या दौऱ्यातील पहिल्या दिवशी त्यांनी शेर-ए-काश्मीर आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्स सेंटर (SKICC) या संमेलनाला संबोधित केले.

# दिल्लीचे मुख्यमंत्री केजरीवाल यांना जामीन मंजूर

## केजरीवाल यांना ईडीने 21 मार्च रोजी अटक केली होती

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्ली कथित मद्य घोटाळ्याप्रकरणात ईडीकडून दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यावर मनी लॉंडरिंगचा गुन्हा दाखल करून अटक करण्यात आले होते. गुरुवारी (दि. २० जून) या प्रकरणात दिल्लीच्या राऊस एव्हेन्यू न्यायालयाने अरविंद केजरीवाल यांचा जामीन मंजूर केला. यामुळे ईडीला मोठा झटका मिळाल्याचे दिसते.**

न्यायाधीश न्याय बिंदू यांनी जामीन मंजूर केल्यानंतर ईडीकडून कायदेशीर बाजू मांडण्यासाठी ४८ तासांचा वेळ मागितला गेला. मात्र न्यायाधीशांनी ईडीची मागणी फेटाळून लावत जामीन देण्याचा निर्णय दिला.आम आदमी पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल यांना एक लाख रुपयांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर झाला आहे. त्यामुळे ते शुक्रवारी तुरुंगातून बाहेर येऊ शकतात. दिल्ली कथित मद्य घोटाळ्याप्रकरणी जामीन मिळालेले अरविंद केजरीवाल हे खासदार संजय सिंह यांच्यानंतर दुसरे आप पक्षाचे नेते आहेत. मात्र दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया हे याच प्रकरणात अद्याप तिहार तुरुंगात आहेत. अरविंद केजरीवाल यांनी राऊस एव्हेन्यू न्यायालयात अलीकडचे



जामिनासाठी दोन याचिका दाखल केल्या होत्या. त्यापैकी एक अंतरिम जामिनासाठी आणि एक जामिनासाठी याचिका दाखल केली होती. यापैकी ५ जून रोजी अंतरीम जामिनाची याचिका फेटाळण्यात आली होती. गुरुवारी न्यायालयात सुनावणी सुरू असताना अतिरिक्त महाधिवक्ता एसव्ही राजू यांनी ईडीतर्फे बाजू मांडली. त्यांनी जामीन देण्यास विरोध केला. आम आदमी पक्षाने गोव्याच्या विधानसभा निवडणुकीत जे पैसे खर्च केले, ते हवालामार्फत पक्षाला प्राप्त झाले होते. यामध्ये अरविंद केजरीवाल यांच्या विरोधात थेट पुरावे असल्याचा दावा ईडीकडून करण्यात आला.

### ईडीला मोठा झटका

लोकसभा निवडणुकीत प्रचारासाठी मे महिन्यात केजरीवाल यांना अंतरिम जामीनही मंजूर करण्यात आला होता. त्यानंतर सातव्या टप्प्याचे मतदान होताच २ जून रोजी केजरीवाल पुन्हा तुरुंगात गेले होते.दिल्ली कथित मद्य घोटाळ्याप्रकरणात ईडीकडून दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यावर मनी लॉंडरिंगचा गुन्हा दाखल करून अटक करण्यात आले होते. गुरुवारी (दि. २० जून) या प्रकरणात दिल्लीच्या राऊस एव्हेन्यू न्यायालयाने अरविंद केजरीवाल यांचा जामीन मंजूर केला. यामुळे ईडीला मोठा झटका मिळाल्याचे दिसते.

मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना जामीन मंजूर झाल्यानंतर आप कार्यकर्त्यांनी फटाके उडवून आनंद साजरा केला. केजरीवाल यांच्या सुटकेमुळे लोकशाहीला बळकटी मिळाली आहे, अशी प्रतिक्रिया खासदार संजय सिंह यांनी दिली.ईडीकडून २१ मार्च रोजी अरविंद केजरीवाल यांना अटक करण्यात आली होती. लोकसभा निवडणुकीच्या एक महिना आधा ही अटक झाल्यामुळे आम आदमी पक्षाकडून केंद्र सरकारवर आरोप करण्यात आला होता.

# देशाचा जिवंत असलेला आत्मा म्हणजे खरा हिंदुस्थान

आपल्या देशाची हजारो वर्षांची संस्कृती काही निवडणुकांमुळे आणि दोन-चार लोकांमुळे संपू शकत नाही. ती चालत आहे आणि कायम चालत राहील. या देशाचा एक आत्मा आहे, ज्याला कोणीही मारू शकत नाही. आणि हाच जिवंत असलेला आत्मा म्हणजे खरा हिंदुस्थान असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ गीतकार व संवादलेखक पद्मभूषण जावेद अख्तर यांनी नवव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात केले. जगभरातील सर्वोत्कृष्ट चित्रपट रसिकांपर्यंत पोहोचवणाऱ्या या महोत्सवात जावेद अख्तर यांची तरुण निर्माता-दिग्दर्शक जयप्रद देसाई यांनी प्रकट मुलाखत घेतली, त्यावेळी



अख्तर बोलत होते. प्रसिद्ध हिंदी चित्रपट दिग्दर्शक अनुभव सिन्हा, संयोजन समितीचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, महोत्सवाचे संचालक अशोक राणे, कलात्मक संचालक चंद्रकांत कुलकर्णी, संयोजक नीलेश राऊत, कवी गीतकार दासू वैद्य आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. अख्तर म्हणाले, आपला समाज सध्या एका वळणावर उभा आहे आणि तिथून पुढे काय असणार आहे हे नीट दिसत नाही आहे. समाजवादी काळात सामान्य लोकांचं भलं करण्याचं आश्वासन देण्यात आलं होतं. ते काही प्रमाणात पूर्ण झालं, काही नाही झालं. त्यानंतर आर्थिक उदारमतवाद आला. तिथेही लोकांचं भलं करण्यासाठी काही योजना आणण्यात आल्या.

# दीपिकाचे आई होण्याचे संकेत

बॉलिवूड अभिनेत्री दीपिका पादुकोण ( DEEPIKA PADUKONE ) आणि अभिनेता रणवीर सिंग हे एक लोकप्रिय कपल आहे. दोघांनीही बॉलीवूडमध्ये आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. २०१८ मध्ये दोघांनी लग्नगाठ बांधली. आता त्यांच्या लग्नाला ५ वर्षे पूर्ण झाली आहेत; पण त्यांना अजूनही कोणतेही अपत्य नाही, हे विशेष!. आता दीपिकाने केलेल्या एका वक्तव्यामुळे ती लवकरच गुड न्यूज देणार असल्याची चर्चा रंगली आहे. कुटुंब नियोजनावर ती व्यक्त झाली आहे. एका मुलाखतीत दीपिका म्हणाली की, आम्हा दोघांना लहान मुले खूप आवडतात. आम्हीही त्या दिवसाची वाट पाहत आहोत. त्यावेळी आमचे कुटुंब सुरू होईल. माझे नातेवाईक, मित्रपरिवार नेहमी म्हणतात की, माझ्यात जराही बदल झालेला नाही. हे माझ्यावरील संस्कारांमुळेच. सिनेसृष्टीत पैसे आणि प्रसिद्धीमुळे प्रभावित होणे सोपे आहे; पण घरात कोणीही मला सेलिब्रिटीसारखे वागवत नाहीत. मी सर्वात आधी मुलगी आणि बहीण आहे. रणवीर आणि मला ही आशा आहे की, आमच्या मुलाला लवकरच जन्माला घालू! असेही तिने म्हटलं आहे. बॉलिवूड अभिनेत्री दीपिका पादुकोण ( DEEPIKA PADUKONE ) आणि अभिनेता रणवीर सिंग हे एक लोकप्रिय कपल आहे. दोघांनीही बॉलीवूडमध्ये आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. २०१८ मध्ये दोघांनी लग्नगाठ बांधली. आता त्यांच्या लग्नाला ५ वर्षे पूर्ण झाली आहेत; पण त्यांना अजूनही कोणतेही अपत्य नाही, हे विशेष!. आता दीपिकाने केलेल्या एका वक्तव्यामुळे ती लवकरच गुड न्यूज देणार असल्याची चर्चा रंगली आहे. कुटुंब नियोजनावर ती व्यक्त झाली आहे.



# नेहा पेंडसेच्या घरात ६ लाखांची चोरी

छोट्या पडद्यावरील 'भाबीजी घर पर हैं' ही मालिका चाहत्यांच्या घराघरात पोहोचली आहे. या मालिकेत 'अनीता भाभी'ची मुख्य भूमिका मराठी अभिनेत्री नेहा पेंडसेने साकारली आहे. दरम्यान अनिता भाभीची भूमिका साकारणाऱ्या नेहा पेंडसेच्या घरातून ६ लाखांचा रुपयांची चोरी झाली आहे. नेहाच्या घरातील एका नोकराने ६ लाखांचे दागिने चोरून पळ काढलाय. यानंतर नोकराच्या विरोधात नेहाच्या पतीने शार्दुल पोलिसात गुन्हा दाखल केल्यानंतर त्याला अटक करण्यात आली आहे. या नोकराचे नाव सुमित कुमार सोलंकी असे आहे. एका रिपोर्टच्या माहितीनुसार, 'भाबीजी घर पर हैं' मालिकेतील 'अनीता भाभी' म्हणजे, नेहा पेंडसे तिच्या पती शार्दुलसोबत अरिटो बिल्डिंग, वांद्रे पश्चिम, मुंबईत राहते. दरम्यान शार्दुलला घरातील ६ लाखांचे दागिने लंपास झाल्याची माहिती पोलिसांना दिली आणि घरातील नोकराच्या विरोधात गुन्हा दाखल केला. या तक्रारीत शार्दुलने चोरीला गेलेल्या वस्तुत सोन्याचे ब्रेसलेट आणि हिऱ्याची अंगठी असल्याचे सांगितले आहे. दरम्यान पोलिसांनी घरातील सर्व नोकरांना बोलावून त्याची चौकशी केली. मात्र, या चौकशीदरम्यान नेहा पेंडसे घरात राहत असेलला नोकर सुमित कुमार सोलंकी बेपत्ता असून तो कुलाब्यात असल्याचे समजते. यानंतर पोलिसांनी त्याला फोनवरून या चोरीबद्दल विचारणा केली असताना त्यांने उत्तरे देण्यास टाळाटाळ केली. या प्रकारावरून पोलिसांनी त्याच्यावर संशय घेत सुमितला अटक केली. मात्र, चोरीचे दागिने अद्याप सापडलेले नाहीत. दरम्यान त्याच्यावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. ड्राइव्हरने दिलेल्या माहितीनुसार, नोकर सुमित सोलंकीची दागिन्यांवर नजर पडली आणि त्याने त्याच्यावर डल्ला मारला. नेहाच्या घरी सुमित इतर लोकांसोबत राहत होता. सोन्याचे ब्रेसलेट आणि हिऱ्याची अंगठी या दोन्ही गोष्टी नेहाने शार्दुलला गिफ्ट केल्या होत्या. तर दुसरीकडे ही चोरीची घटना बाहेर कशी लीक झाली याबाबत नेहा आश्चर्यचकित व्यक्त करत आहे.

# सुरभी ज्योती लवकरच म्हणणार 'कुबूल है'?

सध्या मनोरंजन विश्वातही लगीन घाई सुरु आहे. नुकतीच आमिर खानची मुलगी आयरा खानने नुपूर शिखरेसोबत लग्न केलं तर अभिनेत्री रकुल प्रीतने देखील तिचा बॉयफ्रेंड जॅकी भगनानीसोबत लग्न करणार असल्याचे सांगितले. त्यानंतर आता आणखी एका अभिनेत्री नववधू होण्यासाठी तयार असल्याच्या चर्चा आहेत. ती अभिनेत्री म्हणजे कबूल है फेम अभिनेत्री सुरभी ज्योती. सर्वांची लाडकी झोया म्हणजेच सुरभी ज्योती तिचा बॉयफ्रेंड सुमित सुरीसोबत लग्न करणार आहे. सुरभी नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते. ती तिच्या कामाव्यतिरिक्त लव्ह लाईफमुळे देखील चर्चेत राहिली आहे. सुमित सुरीपुर्वी सुरभीचे नाव अभिनेता पर्ल व्ही पुरीशी जोडले गेले होते. आता सुरभीच्या लग्नाची सोशल मिडियावर चर्चा होत आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, सुरभी ज्योती सुमित सुरीसोबत लग्नबंधनात अडकणार आहे. सुमित हा बिझनेसमॅन असण्याबरोबरच अभिनेता आणि निर्माता आहे. सुरभी बऱ्याच वर्षांपासून सुमितला डेट करत आहे. सुरभी आणि सुमित हे 6 किंवा 7 मार्चला लग्न करणार असल्याचा दावा सुरभीच्या जवळच्या मैत्रिणीने केला आहे. तिच्या लग्नात फक्त कुटुंब आणि मित्र उपस्थित राहणार आहेत. सुमित सूरीने द टेस्ट केस आणि होम सारख्या ओटीटी शोमध्ये काम केले आहे. त्याने सुरभीसोबत एका म्युझिक व्हिडिओमध्ये काम केले आहे. 2018 मध्ये त्याच्या नात्याच्या चर्चा सुरु झाल्या होत्या.



# टीम इंडियाने पार केली 'अफगाण खिंड'!

## सूर्यकुमार यादवची अर्धशतकी खेळी ठरली निर्णायक

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**भारताच्या फलंदाजांची विस्फोटक फलंदाजी, रोहित शर्माची चालाख कॅप्टन्सी आणि बुमराह-कुलदीपच्या भेदक गोलंदाजीसह भारताने अफगाणिस्तानला ऑल आऊट करत ४८ धावांनी विजय मोठा मिळवला. सामन्याच्या सुरूवातीला भारताचा डाव गडबडला खरा पण प्रत्येक फलंदाजाने दिलेल्या धावांच्या योगदानाने भारताने चांगली धावसंख्या उभारली. पण अफगाणिस्ताननेही भारताच्या फलंदाजांना आपल्या फिरकीच्या जाळ्यात अडकवून ठेवले होते.**



यानंतर आलेल्या जागतिक क्रमवारीतील नंबर वन टी-२० फलंदाज असलेल्या भारताच्या सूर्यकुमार यादवने आपला क्लास दाखवत एक झंझावाती अर्धशतकी खेळी केली. तर हार्दिकसोबतची भागीदारी महत्त्वपूर्ण ठरली. तर बुमराहने आपल्या भेदक गोलंदाजीचे प्रदर्शन करत ७ धावा देत ३ विकेट्ससह सर्वोत्कृष्ट गोलंदाजी केली. तर अक्षर पटेल, जडेजा आणि कुलदीपसारख्या गोलंदाजांनी त्याला साथ दिली. अर्शदीपने स्पेलमधील अखेरच्या दोन षटकांमध्ये तीन विकेट्स घेत संघाचा विजय अधिक सोपा केला. अर्शदीपच्या सामन्यातील अखेरच्या चेंडूवर नूर अहमदला झेलबाद करत अफगाणिस्तानला ऑल आऊट केले. जसप्रीत बुमराहनंतर अर्शदीपनेही ३ विकेट्स घेतल्या आहेत. भारतीय कर्णधार रोहित शर्माने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला होता. संथ सुरुवातीनंतर भारताने तिसऱ्या षटकातच रोहितची (८) विकेट गमावली, जो फजलहक फारुकीच्या चेंडूवर मोठा शॉट खेळण्याच्या प्रयत्नात झेलबाद झाला. ऋषभ पंतने फारुकीला येताच चौकार मारला, तर कोहलीने नवीन उल हकला आयकॉनिक षटकार मारून स्वागत केले.अफगाणिस्तानचे फलंदाज भारतीय गोलंदाजीसमोर टिकू शकले नाहीत आणि झटपट माघारी परतले. जसप्रीत बुमराहने दोन्ही सलामीवीरांना पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. रहमानउल्ला गुरबाजने १ तर हजरतुल्ला झझाईने २ धावा केल्या. टी-२० विश्वचषकात पहिला सामना खेळणाऱ्या कुलदीप यादवने गुलबदिन नायबला पॅव्हेलियनमध्ये पाठवले. अजमतुल्ला उमरझाईला रवींद्र जडेजाने बाद केले. त्याने २६ धावा केल्या. मोहम्मद नबी १४ धावा करत माघारी परतला. अफगाणिस्तान संघासाठी एकही खेळाडू मोठी खेळी करू शकला नाही. त्यामुळे संघाला २० षटकांत केवळ १३४ धावा करता आल्या. भारताकडून जसप्रीत बुमराहने सर्वाधिक विकेट घेतल्या. त्याने तीन विकेट घेत चार षटकात केवळ 7 धावा दिल्या. अर्शदीप सिंगनेही तीन विकेट घेतले. त्याने शेवटच्या चेंडूवर नूर अहमदची विकेट घेतली. कुलदीप यादवने दोन, रवींद्र जडेजा आणि अक्षर पटेलने प्रत्येकी एक विकेट घेतली. पंतने नबीवर सलग तीन चौकार लगावले. मात्र, नवीनने त्याचा झेल सोडत त्याला जीवदान दिले. पॉवर प्लेमध्ये भारताने एक बाद ४७ धावा केल्या होत्या. मात्र पंत पुढच्याच षटकात रशीदच्या फिरकीवर पायचीत झाला. त्याने ११ चेंडूंत चार चौकारांसह २० धावा केल्या. पुढच्या षटकात रशीदकडून फटका मारण्याच्या प्रयत्नात कोहली (२४) लाँग ऑफ बाऊंड्रीवर नबीकरवी झेलबाद झाला. शिवम दुबेने (१०) नूर अहमदवर षटकार तर सूर्यकुमार यादवने रशीदला षटकार लगावला. त्यानंतर रशीदच्या गोलंदाजीवर शिवम दुबे एक षटकार लगावत पायचीत झाला. सूर्यकुमार यादवने उत्कृष्ट खेळी केली आणि त्याच्यामुळेच टीम इंडिया मोठी धावसंख्या गाठण्यात यशस्वी ठरली. तर त्याला हार्दिक पांड्याने चांगली साथ दिली. सूर्याने २८ चेंडूत पाच चौकार आणि तीन षटकारांसह ५३ धावा केल्या आणि हार्दिकने २४ चेंडूत ३२ धावा केल्या.

### अफगाणिस्तानचा डाव कोसळला

सूर्यकुमार, हार्दिक पंड्या आणि जडेजा बाद झाल्यानंतर मैदानात आलेल्या अक्षर पटेलने हुशारीने खेळी करत अखेरच्या षटकात महत्त्वपूर्ण १४ धावा केल्या. यासह भारताने १८१ धावांची धावसंख्या गाठल्या. अफगाणिस्तानकडून फजलहक फारुकी आणि राशिद खान यांनी प्रत्येकी ३ विकेट घेतले.यानंतर आलेल्या जागतिक क्रमवारीतील नंबर वन टी-२० फलंदाज असलेल्या भारताच्या सूर्यकुमार यादवने आपला क्लास दाखवत एक झंझावाती अर्धशतकी खेळी केली. तर हार्दिकसोबतची भागीदारी महत्त्वपूर्ण ठरली. तर बुमराहने आपल्या भेदक गोलंदाजीचे प्रदर्शन करत ७ धावा देत ३ विकेट्ससह सर्वोत्कृष्ट गोलंदाजी केली. तर अक्षर पटेल, जडेजा आणि कुलदीपसारख्या गोलंदाजांनी त्याला साथ दिली.

# वेस्ट इंडिजच्या सुपर ८ फेरीत वाढल्या अडचणी

## इंग्लंडविरुद्धच्या सामन्यात स्टार फलंदाज ब्रँडन किंगला दुखापत

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आयसीसी टी-२० विश्वचषक २०२४ स्पर्धेतील सुपर ८ फेरीचे सामने सुरु झाले आहेत. पण विंडीज संघाला पहिल्याच सामन्यात पराभवाला सामोरे जावे लागले. वेस्ट इंडिजचा इंग्लंडविरुद्ध ८ विकेट्सने पराभव झाला. आता सुपर ८ मध्ये वेस्ट इंडिजला पुढील सामने दक्षिण आफ्रिका आणि अमेरिकेविरुद्ध खेळायचे आहेत. त्याचबरोबर उपांत्य फेरी गाठण्यासाठी दोन्ही सामने कोणत्याही किंमतीला जिंकावे लागतील. पण याआधीच वेस्ट इंडिजसाठी एक वाईट बातमी समोर आली आहे.**




इंग्लंडविरुद्धच्या सामन्यात वेस्ट इंडिजचा सलामीवीर फलंदाज ब्रँडन किंगला दुखापत झाल्यामुळे रिटायर्ड हर्ट व्हावे लागले होते. पाचव्या षटकात सॅम करनचा एक चेंडू लागल्याने तो वेदनेने कोसळला. यानंतर तो मैदानाबाहेर गेला. त्याने सामन्यात १२ चेंडूत २३ धावा केल्या होत्या आणि तो चांगल्या फॉर्ममध्ये दिसत होता. मात्र दुखापतीमुळे त्याला मैदान सोडावे लागले. आता क्रिकेट वेस्ट इंडिजने त्यांच्या निवेदनात पुष्टी केली आहे की त्याला साइड स्ट्रेनचा त्रास होत आहे.ब्रँडन किंगला झालेली साइड स्ट्रेनची दुखापत बरी होण्यासाठी एका आठवड्यापेक्षा जास्त वेळ लागतो. ब्रँडन किंगची दुखापत बरी न झाल्यास २०२४ च्या टी-२० विश्वचषकातील उर्वरित सामने खेळणे त्याच्यासाठी कठीण होईल. जर तो सावरला नाही तर वेस्ट इंडिजकडे आंद्रे फ्लेचर, काइल मेयर्स, फॅबियन ॲलन, हेडन वॉल्श जूनियर आणि मॅथ्यू फोर्ड यांच्या रूपाने पाच राखीव खेळाडू आहेत. यापैकी कोणालाही संधी मिळू शकते.वेस्ट इंडिजचा कर्णधार रोव्हमन पॉवेल म्हणाला की होय, थोडी चिंता आहे पण आशा आहे की तो पुढील सामन्यात चांगली कामगिरी करू शकेल. तो आमच्यासाठी किती महत्त्वाचा खेळाडू आहे हे आम्हाला माहीत आहे. वेस्ट इंडिजने ग्रुप स्टेजमध्ये चांगली कामगिरी केली होती आणि सलग चार सामने जिंकून सुपर ८ मध्ये स्थान पक्के केले होते. मात्र सुपर ८ च्या पहिल्याच सामन्यात संघाला पराभवाला सामोरे जावे लागले.

### दुखापत झाल्यामुळे रिटायर्ड व्हावे लागले

२०१२ आणि २०१६ मध्ये वेस्ट इंडिजने टी-२० विश्वचषक जिंकला आहे.आयसीसी टी-२० विश्वचषक २०२४ स्पर्धेतील सुपर ८ फेरीचे सामने सुरु झाले आहेत. पण विंडीज संघाला पहिल्याच सामन्यात पराभवाला सामोरे जावे लागले. वेस्ट इंडिजचा इंग्लंडविरुद्ध ८ विकेट्सने पराभव झाला. आता सुपर ८ मध्ये वेस्ट इंडिजला पुढील सामने दक्षिण आफ्रिका आणि अमेरिकेविरुद्ध खेळायचे आहेत. त्याचबरोबर उपांत्य फेरी गाठण्यासाठी दोन्ही सामने कोणत्याही किंमतीला जिंकावे लागतील. पण याआधीच वेस्ट इंडिजसाठी एक वाईट बातमी समोर आली आहे. इंग्लंडविरुद्धच्या सामन्यात वेस्ट इंडिजचा सलामीवीर फलंदाज ब्रँडन किंगला दुखापत झाल्यामुळे रिटायर्ड हर्ट व्हावे लागले होते.